म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ४५२१

JUL 1975

वा. क्र. ४५२९-

8 JUL [illegible]

14 NOV 1976

31 MAY 1977

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय विभाग.
दा. क्र. ४५२१



# निळें कमळ

लेखक

बा. गो. नाईक, एम्. ए., बी. टी.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

BVBK-0404521



मूल्य दहा आणे



* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *


मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

पहिली आवृत्ति : १९५३]


[सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन


* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



विजया आणि मंगला अभ्यंकर ह्यांना...



# प्र स्ता व ....

गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यांत आम्ही बनारसजवळच्या सुप्रसिद्ध सारनाथला गेलों होतों. तेथील बुद्धस्तूप, जुने अवशेष आणि बुद्ध-मंदिरें पाहून मनाला अतिशय आनंद झाला आणि कधींही न अनुभविलेल्या समाधानानें मन भरून गेलें. येथील एका रम्य मंदिरांत ठेवलेल्या पुस्तकांपैकीं कांहीं पुस्तकें चाळून पाहून एक छोटेंसें गोष्टींचें पुस्तक प्रवासांत वाचायला उपयोगी पडेल म्हणून मीं विकत घेतलें. ह्या पुस्तकांत स्वार्थत्याग आणि प्रेम ह्या भावनांवर लिहिलेल्या बोधिसत्त्वाच्या अनेक छोट्या गोष्टी माझ्या वाचनांत आल्या. ह्या गोष्टींतून प्रगट झालेल्या उदात्त भावनांचा ठसा मनावर इतका उमटला कीं ह्या जीवनगंगेंतील एक थेंब जरी आपणांस नेतां आला तरी आपण कृतार्थ होऊं असें हिमालयापर्यंत केलेल्या त्या दीर्घ प्रवासांत सारखें मनांत घोळत होतें. त्या गोष्टींमधून बिंदुरूपानें घेतलेला मधु मध्यवर्ति कल्पनेच्या रूपानें " निळें कमळ " ह्या कथेंत आहे.

ह्या कथेची भावना आणि सर्व उत्कृष्ट वाङ्मयाच्या मुळाशीं असणारी मानव्याची कल्पना भगवान् बुद्धाच्या शिकवणींतील आहे. कथेची मांडणी आणि प्रसंगाची रचना लेखकाची काल्पनिक आहे. ह्या कथेंत आणि माझ्या बालवाचकांच्या हातीं देत असलेल्या ह्या निळ्या कमळांत जें कांहीं मोहक, मधुर आणि सुवासिक असेल तें भगवान् बोधिसत्त्वाचें आहे, जें कांहीं टाकाऊ असेल तें माझें आहे.

मा. गो. नाईक

शिवाजी-नगर, सांगली
वैशाख पौर्णिमा १८७५



# अनुक्रमणिका


१. प्रतिज्ञा ... ... ९
२. निळें कमळ ... ... १६
३. वडवानळांत ... ... २४
४. लक्षद्वीपाकडे ... ... ३०
५. नरराक्षस ... ... ३६
६. नलिनी कीं निळें कमळ ? ४३
७. फटक्यांची शिक्षा ... ५१
८. आत्मार्पण ... ... ५७

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २६६२८
विभाग बालवाङ्मय
क्रमांक १६८
नों. दि. २०।३।५०

# निळें कमळ



# प्रतिज्ञा

सावळ्या सूर्याच्या किरणांबरोबर लडिवाळपणानें खेळणाऱ्या समुद्राच्या लाटांकडे तुम्हीं कधीं टक लावून निरखून पाहिलें आहे ? त्या सोनेरी लाटांना मऊ हातानें गोंजारणारा सूर्य आभाळाच्या रंगीबेरंगी रस्त्यावरून हळूहळू पावलें टाकीत कोठें चालला आहे, माहीत आहे तुम्हांला ? कोणी म्हणतात, तो पृथ्वीवरच्या दूर देशांकडे चालला आहे, तर कोणी म्हणतात, तो आतां समुद्राच्या तळाशीं खोल बुडी मारून विश्रांति घेण्यासाठीं सागरलोकाकडे चालला आहे.

मग समुद्राच्या तळाशीं लोकांची वसती आहे तर ! होय, आपणां-सारखेच बोलणारे, हसणारे, एकमेकांवर प्रेम करणारे लोक समुद्राच्या

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

तळाशीं वसती करून राहिलेले आहेत. पण त्या लोकांना समुद्रांतच शेकडों योजनें आंत खोल पोहत हिंडावयाचें असल्यानें देवानें त्यांना आमच्यासारखे पाय मात्र ठेवले नाहींत. पण त्यांना पोहायला सोपें पडावें म्हणून माशासारखें एक छानदार शेपूट असतें. ह्या एका गोष्टीशिवाय आमच्यासारखेच त्यांना हात, नाक, कान, डोळे, केस असतात. हे लोक जेथें राहातात आणि वावरतात त्याला सागरलोक असें म्हणतात.

ह्या सागरलोकांतल्या एका उंच आणि सुंदर प्रवाळमय प्रासादांत एका मऊ बिछान्यावर श्यामला पडली होती. ती खूप आजारी असल्यानें एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळत ती कण्हत होती. आजारामुळें तिला यातना तर होतच होत्या, पण कांहीं तरी खोल मानसिक दुःख तिला चैन पडूं देत नव्हतें. कोणतें बरें तें दुःख?

"वरुणा, मीना...." श्यामलेनें क्षीण आवाजांत आपल्या दोन लाडक्या मुलींना हाक मारली.

"काय आई?" त्या दोघी मुली हृदयावर हात ठेवून करुण दृष्टीनें श्यामलेकडे पाहूं लागल्या.

"बाळांनो, मी ह्या आजारांतून आतां बरी होत नाहीं. लवकरच हा लोक सोडून मला जावं लागणार."

"पण आई, तुला लवकरच बरं वाटेल." मीना म्हणाली.

"छे, छे, मीना...." बोलतांना आणि हालचाल करतांना जरी त्रास होत होता तरी एका अंगावर किंचित् वळून मीनेकडे पाहात श्यामला म्हणाली, "मीना, जगण्याची आशा नको आतां. मला मरणाचं भय नाहीं वाटत, पण तो....तो आपल्या सागरलोकाला भोगायला लागणारा तो भयंकर शाप.... त्याची आठवण....!" श्यामलेच्या देहाचा भीतीनें थरकांप झाला आणि तिला क्षणभर मूर्च्छा आली.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

थोड्या वेळानें शुद्धीवर आल्यानंतर वरुणा आणि मीना बोलूं नको म्हणत असतांही श्यामला म्हणाली,

" माझ्या लाडक्या मीना, इकडे ये आणि मला घट्ट मिठी मार. वरुणा, तूंही ये .... " मीना आणि वरुणा ह्यांनीं आपल्या आईच्या कुशींत तोंडें लपविलीं आणि त्या रडूं लागल्या.

" वरुणा, मी जरी गेलें तरी माझं .... आपल्या घराण्याचं अजून अपुरं राहिलेलं काम पुरं करण्याची खटपट तुम्ही कराल ? "

" आई, तूं सांगशील त्याप्रमाणें आम्ही करूं, पण कोणतं काम तें ? सांग ना आम्हांला. " मीना म्हणाली.

" थांब सांगतें, मला थोडा श्वास घेऊं दे. " क्षणभर थांबून श्यामला म्हणाली, " आपल्या प्रासादाच्या दक्षिणेकडील बाजूस दूर दूर तुम्हीं कधीं पाहिलं आहे ? "

" होय आई, " मीना एकदम म्हणाली, " मी एकदा आमच्या गच्चीवरून दूर पाहात असतां पांढऱ्या शुभ्र पर्वताच्या शिखरासारखी एक आकृति मला दिसली आणि बघतां बघतां त्या बाजूस रडण्याचे करुण विव्हळ स्वर कानांवर येऊं लागले. पण हा काय प्रकार आहे हें मला कधींच कळलं नाहीं आणि भीतीमुळें मीं तें कुणाला विचारलंही नाहीं. "

" मीना, वरुणा, ऐका, तेंच मी आतां सांगणार आहें. नीट ऐका आणि ह्या घोर शापांतून आपल्या सागरलोकाला सोडविण्याची खटपट करा. "

" शाप .... कसला शाप ? "

" होय शाप ! " थोडा वेळ थांबून श्यामलेनें पुन्हा बोलण्यास सुरुवात केली,

" फार फार वर्षांपूर्वी आपले पूर्वज केवळ दुष्ट वृत्तीचे पशु होते. स्वतःचा प्राण जगविण्यासाठीं ते एकमेकांना खाऊनही टाकत असत. "

" अगबाई, किती दुष्ट लोक ! " मीना कळवळून म्हणाली.

२६६३८ नों. दि. २५।३।५९

“ पण ह्या त्यांच्या दुष्ट वृत्तीचीं फळं आजसुद्धा आम्ही भोगतों आहोंत. सर्व सागरलोकाच्या ह्या दुष्ट मनोवृत्तीमुळेंच एकदा एका महान् ऋषीनें आमच्या सर्व समाजाला शाप दिला. ”

“ कोणता शाप दिला ? ” वरुणा म्हणाली.

“ शाप दिला कीं ‘ नीचांनो, प्रेम ही भावनाच तुमच्यापाशीं नाहीं, तुमच्या आत्म्याला मुक्ति मिळणार नाहीं. शेकडों, हजारों वर्षं तुम्ही दुःखांत .... यातनांत पडाल ! ’ आणि .... ”

“ आणि मग ? ” मीना म्हणाली.

“ तेव्हांपासून आमच्या दुःखाला सुरुवात झाली. तेव्हांपासून आपल्या सागरलोकांतील माणसांचं आयुष्य संपलं कीं त्यांना त्या .... त्या दक्षिणेकडील पर्वताकडे यमदूत नेतात आणि त्यांचे देह प्रवाळाचे बनवून त्या खडकावर रचून ठेवतात. ”

मीना आणि वरुणा ह्यांना ही हकीकत ऐकून भीतीनें कांपरेंच भरलें. त्या दोघीही आपल्या आईला अधिकच बिलगल्या.

“ आपल्यालाही आई तिकडेच नेणार का ग ? ” मीना म्हणाली.

“ होय बाळ, आपल्यालाही सर्वांच्याप्रमाणें तिकडेच जावं लागणार. गेल्या एक लक्ष वर्षांत त्या ठिकाणीं सागरजनांच्या देहांचा आणि आंत जखडलेल्या आत्म्यांचा एक मोठा पांढरा शुभ्र पर्वतच निर्माण झाला आहे. आज कित्येक वर्षं तिथें स्त्रिया, पुरुष, मुलं वर्षंन् वर्षं .... ऐक .... तो .... तो .... आवाज ऐक .... ”

आणि श्यामलेनें भीतीनें डोळेच मिटून घेतले.

समुद्राच्या गंभीर लाटांबरोबर विव्हळण्याचे, रडण्याचे, आक्रोशाचे खूप दूरचे अस्पष्ट स्वर वरुणेच्या आणि मीनेच्या कानांवर आले.

"ह्यांतून आपली सुटका व्हायचीच नाहीं का? ह्या सगळ्या जीवांना सोडवण्याचा उपायच नाहीं का?" मीना कसला तरी विचार करीत म्हणाली.

"ह्या शापांतून आणि पापांतून, मीना, आमची सुटका कशी होणार कुणास ठाऊक!" श्यामला निराशपूर्ण आणि क्षीण आवाजांत म्हणाली, "पण ती सुटका जर व्हायची असेल, तर लोक म्हणतात कीं त्या पर्वताचं टोक समुद्राच्या पृष्ठभागाला टेकण्यापूर्वींच त्या सगळ्या जीवांची सुटका झाली पाहिजे. आयुष्य संपलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या देहागणिक त्या पर्वताचं टोक उंच उंच वाढत आहे आणि तिकडून आलेले लोक असं सांगतात कीं आतां त्या पर्वताचं टोक पाण्याखालीं फक्त एक वीतभरच राहिलेलं आहे. तेवढी त्याची उंची वाढली कीं .... "

"कीं मग काय होईल?" अधीरतेनें वरुणेनें विचारलें.

"मग सुटकेची आशाच संपली! असं सांगतात कीं त्या पर्वताला आकाशाखालच्या वाऱ्याचा स्पर्श झाला कीं तो एकदम कठीण होणार आहे आणि त्या पर्वतावरचे पूर्वींचे आणि त्यावर पुन्हा येणारे सगळे जीव कायमचे बंदिवान होणार आहेत."

"एखादा महान् पुरुष जन्माला येऊन आमची ह्या शापांतून सुटका नाहीं का करणार?" मीनेच्या ह्या प्रश्नानें किंचित् मळल हास्य करीत श्यामला म्हणाली,

"वेडी आहेस तूं मीना. आमचा उद्धार पुरुषांच्या हातून नाहीं होणार. पूर्वीं एका ज्योतिष्यानें भविष्य वर्तवलं आहे कीं ह्या सागरप्रदेशांत एक स्त्री जन्माला येईल आणि कदाचित् ती ह्या पापांत पडलेल्या सागरजनांचा उद्धार करण्याची खटपट करील. तिच्या हातून जर हें काम झालं नाहीं, तर मग आमचा पुन्हा कधींच उद्धार होणार नाहीं."



प्रतिज्ञेची खूण म्हणून तिनें आपले केस मोकळे सोडले.

"पण आई, अशी स्त्री केव्हां जन्माला येईल? कोणत्या उपायांनीं ती सोडवील ह्या सगळ्या जीवांना?" वरुणेनें विचारलें.

"तें मात्र नक्की असं कुणालाच सांगतां आलं नाहीं. कुणी एका चमत्कारिक फुलाचा शोध करा म्हणून सांगतात, कुणी अग्नीचा शोध करायला सांगतात. पण त्या वेळेपासून आपल्या घराण्यांतील प्रत्येक वडील स्त्री प्रतिज्ञा घेत असते आणि सागरजनांच्या सुटकेचा उपाय सापडेपर्यंत आपले केस तिनें मोकळे सोडायचे असतात तशी प्रतिज्ञा आजपर्यंत मीं घेतली होती. ह्यापुढें .... वरुणा .... आतां ....तूं...."

इतका वेळ बोलल्यामुळें श्यामलेचा श्वास खूप जोरानें वाहूं लागला. बोलण्याच्या श्रमानें तिला फारच अशक्तपणा आला.

"आई, ह्या क्षणापासून मी तशी प्रतिज्ञा घेतें!" वरुणा निश्चयपूर्वक म्हणाली आणि श्यामलेच्या पायांना स्पर्श करून प्रतिज्ञेची खूण म्हणून तिनें आपले केस मोकळे सोडले.

"मी आतां सुखानें मरेन! पण.... ही प्रतिज्ञा पुरी करण्याची तूं जिवापलीकडे खटपट कर." श्यामलेनें त्यानंतर आपल्या लाडक्या मुलींचा आणि ह्या जगाचा निरोप घेतला.

क्षणार्धांत पारदर्शक शरीराचे यमदूत त्या ठिकाणीं आले आणि बघतां बघतां श्यामलेचा देह दक्षिणेकडील बाजूला त्या शुभ्र पर्वताच्या दिशेनें सागराच्या लाटांखालून निघून गेला.



# निळें कमळ

आईच्या मृत्यूनंतर वरुणेचा धीर पुरा खचून गेला. तेराचौदा वर्षांची मीना आणि वीस वर्षांची वरुणा ह्या सख्ख्या बहिणी. त्याच काय त्या आतां एकमेकींना बोलून धीर आणि विसावा द्यायला मागें उरल्या होत्या. त्या भव्य प्रासादांत आतां त्यांचें असें दुसरें कोणीही नव्हतें.

वरुणेनें घेतलेली ती कठीण प्रतिज्ञा ! पण ती आतां पुरी कशी करायची ? कोणत्या उपायानें करायची ? कांहींच सुचेना तिला. तिची आवडती आई निघून गेल्यापासून तिच्या दुःखाला सीमा उरली नव्हती. जशी शरीरानें तशी मनानेंही ती थोडी दुबळी असल्यानें तिला कांहींच सुचेना. दररोज

चिंतेनें ती वाळत चालली आणि एके दिवशीं मीना बाहेरून आली तों .... तिनें काय पाहिलें ?

वरुणा अंथरुणावर शेवटची घटका मोजीत पडलेली ! काळजीनें तिचा सगळा देह सुकून गेला होता आणि तिच्या सगळ्या शक्ति नष्ट झाल्या होत्या. तिच्या शरीरांत हाडांचा नुसता सांगाडा उरला होता. मीनेला पाहातांच कष्टानें ती म्हणाली,

" मीना .... जातें मी आतां .... आई गेली तिकडे मी जात्यें .... आतां तूंच माझी ही अपुरी राहिलेली प्रतिज्ञा पुरी करण्याची खटपट कर! माझ्यानें कांहींच झालं नाहीं ह्याची लाज वाटते मला ! "

बिचारी छोटी मीना ! खूपच गांगरून गेली ती ! तिला कांहीं सुचेना कीं कांहीं बोलतांही येईना.

आणि तशा अवस्थेमध्यें वरुणेनें शेवटचा निःश्वास सोडला आणि त्या भयाण जगांत एकट्या मीनेला सोडून तिचाही देह त्या शुभ्र पर्वताकडे निघून गेला.

मीनेचें कोण उरलें होतें आतां ? दुःखाचा कडेलोट झाल्यानें तिला रडूंही येईना कीं तोंडावाटे शब्द किंवा डोळ्यांतून अश्रुही येईनात. तशा स्थितींत बिछान्यावर डोकें टेकून मीना बराच वेळ पडून होती आणि इतक्यांत ....

कोणीं तरी ममतेनें तिच्या डोक्यावरून हात फिरविला. तिनें वर पाहिलें तों एक अत्यंत तेजस्वी तरुण मनुष्य तिच्या जवळ उभा होता. मीना गोंधळून आणि आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे पाहात असतां तो तरुण मनुष्य शांत आणि गंभीर स्वरानें म्हणाला,

" मीने .... बाळ, धीर धर .... निराश होऊं नकोस. ती प्रतिज्ञा घे आणि तें सोन्याच्या देठाचं निळं कमळ शोधून आण ! "

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

'निळं कमळ! निळं कमळ!' मीना एकदम शुद्धीवर आली. तो तेजस्वी तरुण नव्हता. निव्वळ दुःखातिरेकानें भास झाला होता तो मीनेला. पण भास तरी कसा म्हणायचा? कारण मीनेनें ते शब्द अगदीं स्पष्टपणानें ऐकले होते. तिनें वेड्यासारखे पुन्हा ते शब्द उच्चारले,

'निळं कमळ!'

आणि त्या प्रवाळाच्या प्रासादाच्या प्रत्येक भिंतीमधून, जमिनींतून आणि बुरुजामधून एकच प्रतिध्वनि उमटला,

'निळं कमळ!'

मीनेची अवस्था वेड्यासारखी झाली होती. चार दिवस तिनें अन्न घेतलें नाहीं. लोक म्हणत, तिला दुःखानें वेड लागलें आहे, म्हणून ती असंबद्ध बडबडत हिंडते आहे. म्हणे निळें कमळ! समुद्रांत अशी वस्तु कधीं कोणीं पाहिली आहे कीं ऐकिली तरी आहे?

मीना एके दिवशीं मोठ्या पहाटे कूर्मराज नांवाच्या सागरलोकांतील एका प्रख्यात ज्योतिष्याकडे गेली. सागराच्या मध्यभागीं एका खडकाच्या गाभाऱ्यांत कूर्मराज ध्यानस्थ बसले होते. मीना त्यांच्यापुढें हात जोडून उभी राहिली. थोड्याच वेळांत ध्यान विसर्जन करून आणि डोळे उघडून कूर्मराज म्हणाले,

"मीने, तूं कां आली आहेस हें मीं अंतर्ज्ञानानें जाणलं आहे, पण बाळ, तूं तर एक कोवळी बालिका आहेस! तुझ्या हातून हें मोठं काम कसं होणार?"

"महाराज, माझ्या हातून जर हें काम झालं नाहीं तर तें पुन्हा कधींच होणार नाहीं असं मला वाटतं आणि मग आमचा सागरलोक कायमचा दुःखांत बुडून जाईल!"

"पण तें निळं कमळ तूं शोधून आणशील?"

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

" काय ! निळं कमळ ! " मीना आश्चर्यचकित होऊन म्हणाली, " हे शब्द, महाराज, आपणांस कसे कळले ? दहा दिवसांपूर्वी हेच शब्द मीं ऐकले होते. सांगा महाराज, ह्या शब्दांचा काय अर्थ आहे तें मला सागरभाषेंत समजावून सांगा. ह्या वस्तूसाठीं मी माझा प्राणही देईन ! "

" मीने, ही वस्तु तूं मिळवशील तर तुला तुझ्या सागरलोकांची त्या शुभ्र खडकाच्या पर्वतांतून सुटका करतां येईल. आमच्या ग्रंथांत तें स्पष्टच लिहिलं आहे. थांब, तो भागच वाचून मी तुला सांगतों. "

त्यानंतर कूर्मराजांनीं एक मोठा थोरला ग्रंथ एका दगडाच्या मेजावरून उचलून घेतला. बराच वेळ त्यांनीं त्या ग्रंथाचीं पानें चाळलीं. एके ठिकाणीं थांबून त्या ग्रंथांतलीं कांहीं पानें त्यांनीं एकापुढें एक लक्षपूर्वक वाचलीं आणि नंतर आपलें मस्तक वर करून ते म्हणाले,

" फार फार पूर्वीची गोष्ट .... "

मीना लक्षपूर्वक ऐकूं लागली. कूर्मराज पुढें म्हणाले,

" फार पूर्वीं .... सुमारें सव्वालक्ष वर्षांपूर्वी ह्या सागरलोकांत दुष्ट व्यक्तींनीं धुमाकूळ घातला होता. कुणी कुणाचा मित्र नव्हता, प्रत्येकजण स्वार्थासाठीं धडपडत असे इतकंच काय, पण प्रत्यक्ष आईबापसुद्धा आपल्या मुलांना विकायला आणि वेळ पडली तर खाऊन टाकायलाही कमी करीत नसत. सर्व लोकांचा हा दुष्टपणा पाहून त्या वेळीं काश्यप ऋषींनीं त्या सर्व सागरजनांना शाप दिला आणि त्यांचे आत्मे त्या खडकांत बंदिवान करून टाकले. "

" किती दिवस झाले ह्या गोष्टीला ? " मीनेनें मध्येंच विचारलें.

" ह्या गोष्टीला आज बरोबर एक लक्ष चोवीस हजार नऊशें नव्याण्णव वर्षं झालीं. आतां फक्त एकच वर्ष....आजपासून बरोबर एक वर्षानें.... "

" आजपासून एक वर्षानें काय होणार महाराज ? "

" आजपासून बरोबर एक वर्षानें, दररोज वाढणारा तो खडक समुद्राच्या पृष्ठभागाला टेकणार...."

" अगबाई ! आणि मग ?"

" आणि मग सागरजनांचे आत्मे कायमचे बंदिवान होणार ! पण मीना, ह्या ग्रंथांत लिहिलं आहे कीं तो शुभ्र पर्वत समुद्राच्या वरच्या लाटांना टेकण्यापूर्वी जर सोन्याच्या देठाच्या त्या निळ्या कमळाचा त्याला स्पर्श झाला तर ...."

" तर काय होईल ?" अधीरतेनें मीना म्हणाली.

" तर अग्नीच्या स्पर्शानें जसं लोणी तसा तो खडक पार वितळून जाईल, त्या पर्वताचं पाणी होईल आणि त्यांत अडकलेले सर्व जीव मुक्त होतील. त्यानंतर मग केव्हांही ह्या सागरलोकांतील कोणताही जीव पुढें बंदींत पडणार नाहीं."

" पण महाराज, तें सोन्याच्या देठाचं निळं कमळ कुठें बरं मिळेल ? कसलं असतं बरं तें ?" मीनेनें विचारलें.

कूर्मराजांनीं तें सगळें पुस्तक चाळून पाहिलें, पण त्या निळ्या कमळासंबंधींची अधिक माहिती त्यांना कोठेंच मिळाली नाहीं. फक्त एके ठिकाणीं निळ्या कमळाबद्दल एवढींच दोन वाक्यें लिहिलीं होतीं :

' सोन्याच्या देठाचें निळें कमळ ! तें तुमच्यापासून फार दूर असून अगदीं जवळ आहे ! त्याची प्राप्ति अत्यंत दुःखदायक असून फार सुखमय आहे !'

मीनेनें हीं वाक्यें ऐकलीं आणि ती अधिकच बुचकळ्यांत पडली. ' काय बरं ह्या वाक्यांचा अर्थ ?'

" महाराज, ह्या वाक्यांचा अर्थ काय ? कोणत्या समुद्रांत तें निळं कमळ मिळूं शकेल ?"



" आजपासून बरोबर एक वर्षानें... तो खडक समुद्राच्या पृष्ठभागाला टेकणार... "

वाचनालय शाखा.

“मीना, तें मलाही ठाऊक नाहीं आणि ती माहिती ह्या माझ्या ग्रंथांतही नाहीं.

हें ऐकून मीना बरीच निराश झाली. ज्याची माहितीच नाहीं तें कसें मिळवायचें? बराच वेळ विचार करून शेवटीं मीना म्हणाली,

“ह्या निळ्या कमळाशिवाय दुसरा कसलाच का ह्या जीवांच्या सुटकेचा मार्ग नाहीं? दुसरा मार्ग जर तुमच्या पुस्तकांत लिहिला असला तर तो मला सांगा.”

“आहे, दुसरा एक मार्ग आहे आणि तो ह्या ग्रंथांत लिहिलेलाही आहे. पण .... बाळ .... मीना, तो मार्ग तुला सांगण्याचं धैर्य मला होत नाहीं.” दुःखी चेहेऱ्यानें मान हलवीत कूर्मराज म्हणाले.

“सांगा, सांगा तो मार्ग. तो कितीही बिकट असला तरी त्या मार्गानें मी खटपट करीन. कितीही जिवावरचा प्रसंग भोगावा लागला ....”

“नुसता जिवावरचा प्रसंगच नव्हे, तर मीना, तुला आपला प्राण आणि आत्माच अर्पण करावा लागेल!” थोडा वेळ थांबून कूर्मराज हळूहळू बोलूं लागले, “मुली, सांगतों ऐक. त्या पर्वताच्या खडकाचा वर वर चाललेला सुळका अणकुचीदार असून त्याला एका बाजूनें तरवारीसारखी तीक्ष्ण धार आहे. त्या .... त्या धारेवर ....” ह्या वाक्याच्या उच्चाराबरोबर कूर्मराजांच्या अंगाचा थरकांप झाला.

“सांगा ना महाराज पुढें.” मीना म्हणाली.

“सागरलोकाचा उद्धार करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीनें तो पर्वत जलपृष्ठाला टेकण्यापूर्वीं स्वतःच्या जिवंत देहाला त्या तीक्ष्ण टोकाच्या धारेवर फेकून दिलं पाहिजे. त्याबरोबर त्या सुळक्याचं टोक त्या व्यक्तीच्या काळजांत घुसून त्यांतून लाल रक्ताच्या चिळकांड्या उडतील. पण थोडंही दुःख वाटून न घेतां त्या व्यक्तीनें त्या टोकांतून आपलं हृदय उपसून

काढून त्या पर्वताला तीन प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत. त्यानंतर काळजांतून वाहाणाऱ्या रक्तानें त्या पर्वताच्या आसपासचं पाणी लाल होऊन जाईल.... त्या रक्ताच्या प्रभावानें तो खडक वितळून जाईल....सागरलोक मुक्त होईल....पण ती व्यक्ति....ती मात्र एकटीच त्या ठिकाणीं दुःख सहन करीत कायमची जखडून बंदींत राहील!"

"महाराज, किती भयंकर मार्ग हा!"

"पण मीना, तें निळं कमळ किंवा हा उपाय ह्याशिवाय सागरलोकाच्या सुटकेचा दुसरा मार्ग नाहीं! जा, निळं कमळ शोधण्याची तूं प्रतिज्ञा घे आणि खटपट कर. केवळ एकच वर्ष आतां उरलं आहे. ईश्वर तुला शक्ति आणि साहाय्य देवो!"

निळें कमळ! निळें कमळ!! बिचारी चौदा वर्षांची एकटी मीना दुःखी अंतःकरणानें, पण दृढ निश्चयानें त्या अफाट सागरांत सोन्याच्या देठावर उमलणाऱ्या निळ्या कमळाच्या शोधासाठीं निघाली!



# वडवानलांत

सकाळच्या सूर्याचे किरण समुद्राच्या पाण्यानें अडविले गेल्यामुळें फिके होत होत सागरलोकावर अंधुकपणें पसरले होते. सगळा सागरलोक जरी अद्याप झोपेंत होता, तरी मीना झोपली नव्हती. ती आपल्या सुंदर घरापासून उंच उंच पोहत वर गेली. तिनें एकदा पाण्याबाहेर तोंड काढून सूर्याचें दर्शन घेतलें आणि कोवळ्या उन्हांत ती इकडून तिकडे पोहत राहिली. तिचा कमरेपासूनचा खालचा माशासारखा भाग सूर्याच्या किरणांत मोत्याप्रमाणें चमकत होता आणि तिचा गोरापान असा कमरेवरील भाग, रेखीव अवयव, काळेभोर

डोळे आणि लांब कुरळे केस इतके कांहीं सुंदर दिसत होते कीं तिच्यासारखी रूपवान् मुलगी ह्या साऱ्या पृथ्वीवर शोधूनही सापडली नसती. तिचा चेहेरा काळजीनें थोडा सुकून गेला असला तरी त्याचें सौंदर्य थोडेंही कमी झालें नव्हतें.

' सोन्याच्या देठाचं कमळ ! खरंच, ही वस्तु मला कुठें बरं मिळेल ? '

समुद्रांत वरच्या बाजूला इकडे तिकडे फिरतां फिरतां तिला एक भला मोठा मगर दिसला.

" मगरदादा, निळं कमळ पाहिलं आहेस तूं कुठें ? "

मीनेच्या ह्या प्रश्नावर मगरानें आपलें शेपूट जोरानें पाण्यावर आपटलें आणि चार हात लांब असलेला आपला भयंकर जबडा पसरला. त्याचा तो जबडा आणि ते तीक्ष्ण सुळे पाहातांच मीनेची भीतीनें गाळणच उडाली आणि तिनें जी जोरानें पाण्यांत बुडी मारली तें थेट घरच गांठलें.

मीनेच्या प्रासादाच्या बुरुजावर कांहीं लहान लहान मासे विश्रांति घेत बसले होते. त्यांच्या पाठीचा रंग चकचकीत निळसर दिसत होता. मीना हळूच त्यांच्याजवळ गेली आणि त्यांना म्हणाली,

" मुलांनो, निळं कमळ तुम्हीं कुठें पाहिलं आहे ? "

तीं माशांचीं मुलें मीनेच्या आवाजानें आणि विशेषतः तिच्या प्रश्न विचारण्यानें फारच घाबरलीं आणि एकदम चारी दिशांना पळून गेलीं.

मीनेनें खूप विचार केला. विचार करून करून थकल्यावर एके दिवशीं तिला वाटलें, आपण समुद्राच्या आग्नेय दिशेकडे जावें. कारण तिच्या आईनें तिला एकदा असें सांगितलें होतें कीं त्या ठिकाणीं एका भल्या थोरल्या खडकांत एक प्रचंड शेगडी असून तेथें सागरदैत्यांनीं वडवानल नेहमीं पेटत ठेवला आहे. तेथें कदाचित् सोन्याचा देठ असलेलें निळें

कमळ अग्नीमधून तयार होत असेल. तिनें अशी आपली ठाम कल्पना करून घेतली. त्या ठिकाणीं जायचा निश्चय केला आणि आग्नेय दिशेच्या रोखानें मीनेनें आपल्या प्रवासास सुरुवात केली.

मीनेनें सहा दिवस आणि सहा रात्री सारखा प्रवास केला. रात्रीच्या वेळीं दिसेनासें झाल्यावर कोठें जागा मिळाली तर खडकाच्या ओबडधोबड बिछान्यावर अंग टाकून झोपीं जावें. समुद्रांत भक्ष्य मिळविण्यासाठीं वावरणाऱ्या हिंस्त्र श्वापदांपासून बचाव करून घेण्यासाठीं तिला केव्हां केव्हां अंधाऱ्या गुहांचाही आश्रय घ्यावा लागे. वाटेंत जीं मिळतील तीं समुद्रफळें भक्षण करावींत, नाहींतर उपवास करावा, अशा अत्यंत बिकट आणि त्रासदायक प्रवासानें मार्ग आक्रमण करीत करीत ती सागराच्या आग्नेय बाजूस आली.

ह्या ठिकाणीं प्रचंड अग्नि तेवत असला पाहिजे अशी तेथील झगझगीत प्रकाश पाहून मीनेची खात्री झाली. खूप शोध केल्यानंतर एका मोठ्या गुहेच्या तोंडांतून अग्नीच्या ज्वाला बाहेर येत असलेल्या तिला दिसल्या. दुसऱ्या एका बाजूनें प्रयत्नपूर्वक मीनेनें आंत प्रवेश केला.

एका भल्या थोरल्या शेगडींत अग्नि पेटवून काळेकुट्ट दिसणारे समुद्रदैत्य तो भात्यानें सारखा तेवत ठेवीत त्या ठिकाणीं बसले होते. अग्नि पेटविणें हा एकच त्यांचा उद्देश दिसत होता.

'सोन्याचा देठ! खास, ह्या अग्नीमधूनच तो तयार होत असला पाहिजे!' मीनेला तो अग्नि पाहून आनंद झाला आणि तिच्या मुखामधून उद्गार बाहेर पडले,

"अहो दैत्य हो, सोन्याच्या देठाचं एक निळं कमळ मिळेल का मला? पाहा बरं तुमच्या त्या भट्टींत तें निळं कमळ आहे का?"

मीनेचें अस्तित्व ह्या वेळेपर्यंत त्या दैत्यांच्या लक्षांतच आलें नव्हतें, कारण अग्नि पेटविण्याच्या आपल्या कामांत ते फारच गढून गेलेले होते.

पण मीनेच्या प्रश्नानें मात्र ते एकदम खडबडून उठले. त्यांपैकीं एक जण ओरडला,

"अरे, धरा धरा, चोर आला आहे. आपला अग्नि हा विझवून टाकील आणि आपली संपत्ति लुटून नेईल. पकडा त्याला."

दोघे तिघे मीनेच्या अंगावर धावलेही. पण तिनें अत्यंत चपळाईनें त्यांच्या तावडींतून आपली सुटका करून घेतली आणि जोरानें पळ काढला. पण तितक्यांत एका दैत्यानें त्या भट्टींतले कांहीं निखारे खोऱ्यांत घेऊन मीनेच्या अंगावर फेकले आणि तो ओरडला,

"निळं कमळ पाहिजे काय, हें घे!"

ते निखारे मीनेच्या अंगावर पडले आणि त्या प्रखर अग्नीनें ठिकठिकाणीं तिचें अंग भाजून गेलें. पण तरीही, भाजलेल्या अंगाच्या वेदना सहन करीत ती तेथून वेगानें निसटली आणि तिनें समुद्राचा तळ गांठला.

'हाय, हाय! इतका त्रास सोसून, इतका प्रवास करून अखेर निळ्या कमळाचा ठिकाणाही आपणाला कळला नाहीं, उलट अंग पोळल्यानें भयंकर वेदना मात्र वांट्यास आल्या! काय करूं मी आतां? कुठें जाऊं?' शरीराच्या वेदनांपेक्षांही मनाच्या वेदना मीनेला अधिक दुःखदायक वाटत होत्या. 'निळ्या कमळाचा शोध जर लवकर लागला नाहीं, तर ....'

मीनेला वाटलें, 'आज इतकीं वर्षं त्या सोन्याच्या देठावर उमलणाऱ्या निळ्या कमळाचा कुणालाच ठावठिकाणा कळला नाहीं, मग तें मला तरी कसं सापडेल?'

वाटेंत तिला पुष्कळ सागर-स्त्रीपुरुष भेटले. आपल्या लोकांच्या उद्धाराची प्रतिज्ञा घेऊन कोणी एक छोटी मुलगी निघालेली आहे हें त्यांपैकीं पुष्कळांना ऐकून माहीत झालें होतें. जो जो कोणी भेटेल त्याला त्याला ती



...एका दैत्यानें...कांहीं निखारे...मीनेच्या अंगावर फेकले...

निळ्या कमळाची माहिती विचारीत असे. त्यांपैकीं एक पोक्त गृहस्थ तिला म्हणाला,

" वेडे मुली, आपल्या उद्धाराचा मार्ग अद्याप कुणालाच सापडला नाहीं. तुझ्यासारख्या दुसऱ्या पुष्कळ खुळ्या मुलींनीं ही प्रतिज्ञा पूर्वी घेतली होती आणि निळं कमळ शोधण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांपैकीं बऱ्याच मुलींनीं नंतर तो नाद सोडून दिला आणि लग्नं करून त्या संसाराला लागल्या. कांहींजणींना तर पुढें वेड लागलं आणि नंतर त्या ज्या बेपत्ता झाल्या त्यांची वार्ता अद्याप कुणीं ऐकली नाहीं. जा. कुठल्या तरी राजपुत्राशीं लग्न कर आणि सुखानें राहा. हा नाद लवकर सोडून दे कसा. "

ह्या उपदेशाचा मीनेच्या मनावर जरी फारसा परिणाम झाला नाहीं, तरी तिला एवढें मात्र कळून चुकलें कीं आपल्या लोकांच्या सुटकेचा मार्ग आणि त्यासाठीं त्या निळ्या कमळाचा शोध ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं.

एकदा तिला वाटलें, आपण आपल्या घरीं जावें आणि कांहीं दिवस विश्रांति घ्यावी. तथापि तशाच मनस्थितींत पश्चिम दिशेकडे आपली दृष्टि करून ती कांहीं अंतर चालून गेली. तिनें समोर दृष्टि टाकली तों क्षितिजाच्या आसपास एक झगझगीत प्रकाश पसरला आहे असें तिला स्पष्टपणें दिसून आलें. त्या प्रकाशाच्या दिशेनें तिनें कांहीं अंतर पाणी कापलें आणि थोडें पुढें जाऊन ती अधिक निरखून पाहूं लागली, तों ....

ज्याच्यापासून सर्व सागरलोकाची सुटका करण्यासाठीं मीना धडपडत होती तो विक्राळ शुभ्र पर्वतप्राय पांढरा खडक मीनेच्या अगदीं जवळ प्रचंड देहानें तिलाही कवटाळण्यासाठीं उभा ठाकलेला दिसून आला !



# लक्षद्वीपाकडे

भीतीनें मीनेच्या देहाचा थरकांपच उडाला. तिनें हा शुभ्र खडक इतक्या जवळून पूर्वी कधींच पाहिला नव्हता. एक मैल लांब रुंद असलेल्या त्याच्या विस्तारामधून एक प्रचंड सुळका वर आलेला होता. जवळ जवळ तो पाण्याच्या पृष्ठभागाला टेकायलाच आला होता. अद्याप वीत अर्धी वीतच ,काय तें त्याचें वरचें अणकुचीदार टोक पाण्याखालीं होतें.

मीनेची पहिली भीति थोडी ओसरतांच तिनें अधिक जवळून त्या खडकाचें निरीक्षण केलें. त्या अणकुचीदार टोकाची धार भाल्यासारखी

तीक्ष्ण होती. किंबहुना भालाही त्यापुढें बोथटच ठरला असता. त्या टोकाच्या नुसत्या स्पर्शानें कोणाचेंही हृदय पार दुभंगून गेलें असतें.

चार महिन्यांपूर्वीचे ते कूर्मराजाचे भयंकर शब्द मीनेला आठवले, 'निळं कमळ!.... किंवा.... तो उपाय! ह्या टोकावर स्वतःच्या देहाला...'

मीनेनें भीतीनें आपले डोळे मिटूनच घेतले. 'हें भयंकर आत्मदान करण्याची माझ्यांत शक्ति नाहीं. तें निळं कमळही मला सापडत नाहीं. मग हा नाद मी देऊं का सोडून? आजपर्यंत जें कमळ कुणालाच मिळालं नाहीं, ज्याचा नुसता ठावठिकाणाही कुणाला कळला नाहीं, त्या वेड्या मृगजळाच्या मागें मी लागून मला काय बरं फायदा होणार?'

मीनेच्या मनांत निराशेचे विचार येऊं लागले. त्यांतच, एकदा एक देखणा सागरकुमार तिच्याकडे किती प्रेमानें पाहात होता आणि आपली गृहिणी होण्यासाठीं तिला सांगत होता, तो प्रसंगही तिला आठवला.

'ह्या मृगजळाच्या मागें लागण्यापेक्षां मी त्याची गृहिणी होऊन संसार करूं लागलें तर....'

मीनेच्या मनामध्यें हे विचार येतात न येतात तोंच त्या खडकामधून करुण आणि दुःखदायक आर्त स्वर बाहेर येऊं लागले. हा आवाज ऐकल्याबरोबर मीना तर तेथून घाबरून माघारीच फिरली. त्या खडकापासून जोरजोरानें ती दूर जाण्याचा प्रयत्न करूं लागली, पण तो आवाज तिच्या पाठीमागून येतच होता. त्या आवाजांत तिला आपल्या आईचा, बहिणीचा आणि असंख्य भावंडांचाही करुण स्वर ऐकूं येऊं लागला.

पण काय चमत्कार झाला कोणास ठाऊक, मीनेच्या अंतःकरणांत आतां भीतीऐवजीं विलक्षण दया आणि करुणा निर्माण झाली. 'छे, छे, किती दुष्ट आहें मी! माझ्या ह्या कोट्यवधि बांधवांना सोडवण्याची मीं घेतलेली

प्रतिज्ञा इतक्या झटपट सोडून देण्याचा विचार करतें आहें मी! देवा, देवा! मला क्षमा कर. माझ्या सुखापेक्षां मला त्यांच्या सुटकेचं महत्त्व अधिक आहे. तुम्ही सगळे लोक माझेच आहांत. मी जरी वयानें लहान असलें तरी माझं हृदय हें स्त्रीचं आणि आईचं आहे. तुम्ही सगळीं माझीं बाळं आहांत. बाळांनो, तुमची सुटका केल्याशिवाय ही मीना कधींच सुखी होणार नाहीं! तुमची सुटका केल्याशिवाय मला शान्ति नाहीं! निळ्या कमळाचा शोध केल्याशिवाय ही मीना विश्रांति घेणार नाहीं!'

मीनेचा निश्चय पूर्वीपेक्षांही अधिक दृढ झाला. तिला आतां निळ्या कमळाच्या शोधाचें वेडच लागलें होतें. वेड्यासारखी ती दिवसरात्र सगळ्या ठिकाणीं हिंडत असे, पण निळें कमळ कोठें आहे ह्याचा थोडाही मागसूस तिला लागला नाहीं.

बघतां बघतां सहा महिने केव्हांच निघून गेले. आतां अवघे सहा महिने उरले होते. लवकरच कडक थंडीचे दिवस आले आणि त्याबरोबर उत्तरसमुद्रांत राहाणारे मासे आणि इतर प्राणी निवाऱ्यासाठीं मध्यसमुद्राकडे येऊं लागले. लहान, मोठे, हिरवे, पिवळे, निळे, तांबडे, कितीतरी तऱ्हेचे मासे आतां मध्यसमुद्रांत इकडे तिकडे फिरूं लागले होते. त्यांच्या खेळकर लीला पाहात आणि त्यांच्याबरोबर बागडत मीनेचे बरेच दिवस निघून गेले. मीना त्यांपैकीं प्रत्येकाजवळ निळ्या कमळाची चौकशी करी.

एकदा एक मोठा मत्स्यराज धीरे धीरे दक्षिण दिशेकडे निघालेला होता. त्याच्या शेपटीचा आणि पंखांचा रंग गर्द निळा होता आणि त्याच्यावर मोत्याची झाक पसरली होती. त्याचा रंग आणि आकार पाहून मीनेला मोठें कौतुक वाटलें आणि कदाचित् हा सुंदर मत्स्यराज आपणांस निळ्या कमळाचा ठावठिकाणा सांगेल असें वाटून ती म्हणाली,

"मत्स्यराज, निळं कमळ.... सोन्याच्या देठाचं निळं कमळ कुठें बरं मिळेल?"



" पोरी, कमळ हें तुला समुद्राच्या पाण्यांत कसं बरं मिळेलं ? "

ह्या मत्स्यराजानें बराच प्रवास केला होता आणि पुष्कळ माहिती मिळविली होती. मीनेच्या ह्या प्रश्नाला त्यानें लगेच उत्तर दिलें,

" पोरी, कमळ हें समुद्राच्या पाण्यांत तुला कसं बरं मिळेल ? समुद्र ओलांडून तूं जमिनीवर जा. तिथें अनेक सुंदर सुंदर फुलं.... गुलाबाचीं, मोगऱ्याचीं, चाफ्याचीं, जाईचीं छान छान फुलं नेहमीं उमलतात असं लोक बोलतात. तिथें कदाचित् तुला कमळाचं फूल मिळेल."

मीनेला ह्या माहितीनें खूपच आनंद वाटला. लगेच उत्सुकतेनें तिनें विचारलें, " पण मत्स्यराज, जमीन इथून किती लांब आहे ? "

" मुली, ह्या पूर्व बाजूनें तूं पांच दिवस सारखा प्रवास केलास कीं मग तुला लहान लहान बेटं लागतील. तीं बेटं ओलांडून तूं आणखी पुढें गेलीस कीं तुला भारत देशाचा किनारा लागेल. ह्या देशांत खूप कमळं उगवतात असं सांगतात."

मीनेचा आनंद तिच्या हृदयांत मावेनासा झाला. ती म्हणाली,

" मत्स्यराज, मी तुमचे आभार कसे मानूं ? किती मोलाची माहिती तुम्ही मला दिलीत ! वाटेल तो त्रास सहन करावा लागला, तरी मला पर्वा नाहीं. मी पांचच काय, दहा दिवसही सारखा रात्रंदिवस प्रवास करायला तयार आहें, पण तो भारताचा किनारा गांठून मी तिथून निळं कमळ आणणारच आणि माझ्या सर्व बांधवांची सुटका करणारच !"

मीनेनें पूर्व दिशेच्या प्रवासास जायची तयारी केली. तयारी करून बरोबर नेण्यासारखें होतें काय तिचें ? ती एकटीच. पण सर्व सागरलोकाच्या सुटकेची तळमळ, त्यांचा दुःखाबद्दलची सहानुभूति आणि त्यांच्याबद्दलचें प्रेम ही मोठीच प्रवासाला उपयोगी अशी शिदोरी तिच्याबरोबर होती.

मीनेची प्रकृति आतां हळूहळू खालावत चालली होती. आजपर्यंत आईला सोडून ती फारशी कधीं दूर गेलीही नव्हती, पण गेल्या सातआठ

महिन्यांत निळ्या कमळाच्या शोधासाठीं तहानभूक विसरून हिंडत असतां तिला जीं दु:खें सहन करावीं लागलीं आणि प्रत्येक वेळीं ज्या निराशाच पदरीं पडल्या, त्यामुळें तिची सतेज शरीरयष्टि आणि चेहरा सुकून गेला होता. तरीही तिचा धीर बिलकुल खचला नव्हता. उलट दुप्पट आशेनें नि निग्रहानें ती प्रवासाला निघाली. रात्रंदिवस तिनें प्रवास केला. आपल्या बांधवांना वांचविण्याचा उपाय, तें सुवर्णाच्या देठावर उमललेलें निळें कमळ हस्तगत करणें, ही एकच आकांक्षा तिला अनेक संकटांतही शक्ति देत होती, शरीराच्या आणि मनाच्या दु:खाचा भार हलका करीत होती.

आठनऊ दिवस अहोरात्र, विश्रांति न घेतां प्रवास केल्यानंतर ती एके दिवशीं सकाळीं लक्षद्वीपाच्या पश्चिम किनाऱ्यावर आली आणि आयुष्यांत प्रथमच तिनें पाण्याबाहेर जमिनीवर अंग टाकलें !



# नराधम

मीनेला पाय नसल्यामुळें जमिनीवरून सरकतांना तिला फारच त्रास होत होता. केवळ हाताचा आधार घेऊन पुढें सरकावें, त्याशिवाय एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातांच येत नसे. अशा तऱ्हेनें किनाऱ्याकिनाऱ्यानें ती सरकत असतां एका कोळ्याच्या मुलीनें तिला पाहिलें. वस्त्र आणि पाय नसलेल्या ह्या मुलीला पाहातांच तिला तिची फारच दया आली. ती पळत पळत आपल्या झोपडींत गेली आणि तिनें आपला एक जुना परकर आणून मीनेला दिला. आईकडून खायलाही आणून तिनें मीनेस दिलें.

त्या मुलीची आणि मीनेची खूपच गट्टी जमली. दोघीजणी खूप बोलत आणि गप्पागोष्टी करीत समुद्राच्या कांठाला बसत. लक्षद्वीपांतील नाना तऱ्हेचीं फुलें आणून त्या मुलीनें मीनेला दिलीं, पण सोन्याच्या देठाचें निळें कमळ त्यांत एकही नव्हतें. तरी पण ह्या ठिकाणीं आपणास निळ्या कमळाचा ठिकाणा तरी कळेल म्हणून मीनेनें थोडे दिवस तेथेंच राहायचें ठरविलें.

त्या कोळ्याच्या मुलीचें नांव काली असें होतें आणि नांवाप्रमाणें रंगानेंही ती काळी होती. पण तिचा स्वभाव मात्र खूप गोड होता. मीना रोज समुद्रांत बुड्या मारून कालीला आणि तिच्या आईला निरनिराळीं रत्नें, माणकें, मोतीं आणून देत असे. ह्या बिनपायाच्या मुलीकडून आपणास हीं बहुमोल रत्नें मिळतात हें समजल्याबरोबर कालीच्या आईनें मीनेला आपल्या घरींच ठेवून घेतलें. तिला तिनें बाजारांतून छान छान साड्या आणून दिल्या आणि मीना सतत आपल्याच घरीं राहावी म्हणून कालीची आई रोज तिला चांगलें चांगलें खायला घालूं लागली. मीनेला फुलांची फार आवड आहे असें कळल्यामुळें काली व कालीची आई तिला खूप सुवासिक आणि सुंदर फुलें दररोज आणून देत.

बघतां बघतां कालीचें कुटुंब श्रीमंत झालें. मौल्यवान् आणि भारी रत्नें विकून कालीच्या आईनें एक महिन्यांत अफाट संपत्ति जमा केली. कालीच्या शेजाऱ्यांना तिच्या श्रीमंतीचा हेवा वाटूं लागला. लवकरच त्या बेटांत एक वार्ता पसरली. कालीच्या घरीं तिच्या आईनें एक मत्स्यकन्या आणली असून ती कालीला हवीं तेवढीं रत्नें, माणकें, मोतीं रोज समुद्रांतून काढून देते. तिच्यामुळें कालीच्या आईचें भाग्य उदयास आलें आहे.

झालें. ही बातमी पसरतांच कांहीं लोकांनीं कालीच्या घरांतून मीनेला पळवून नेण्याचा बेत केला. माणसाचें तोंड असणाऱ्या ह्या माशाला आपण

पाळलें तर आपणांसही हा प्राणी खूप संपत्ति देईल अशी त्यांना हाव सुटली होती.' एके दिवशीं रात्रीं काळोखांत दहाबारा लोकांनीं हातांत काठ्या आणि दोर घेऊन कालीच्या घरावर चाल केली. कालीच्या आईच्या श्रीमंतीनें अगोदरच त्या बेटांतील सर्व लोकांना तिचा हेवा वाटूं लागला होता. त्यामुळें कालीनें आणि तिच्या आईनें आरडाओरडा केला तरी कोणी त्यांच्या मदतीला आलें नाहीं.

मीना पुष्कळ रडली, ओरडली. पण त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. त्या लोकांनीं मीनेला सहज पकडलें. कारण पाय नसल्यामुळें तिला जमिनीवरून पळतांही येत नव्हतें. मीनेला धरून आणि तिला दोरांनीं घट्ट बांधून त्या लोकांनीं तिला खांद्यावर टाकलें आणि ते तिला घेऊन गेले.

मीनेला एका बागेंतील सुंदर बंगल्यांत कैद करून ठेवण्यांत आलें होतें. तिला जरी कैद करून बंदोबस्तांत ठेवलें होतें तरी प्रथम प्रथम तिची खाण्यापिण्याची आणि ऐषआरामाची फारच उत्तम सोय ठेवण्यांत आली होती. रोज शेकडों लोक तिला पाहाण्यासाठीं येत आणि हा कसला चमत्कारिक प्राणी आहे असें आपापसांत विचारीत आणि आश्चर्य करीत निघून जात.

मीनेनें पुष्कळ विनवण्या आणि गयावया केल्या, तरीही तिला सोडण्यास कोणी तयार होईना. दिवसामागून दिवस झपाट्यानें चालले होते आणि निळ्या कमळाच्या प्राप्तीऐवजीं हा बिकट प्रसंग मात्र मीनेवर येऊन ठेपला होता.

मीना एके दिवशीं त्या लोकांना म्हणाली,

"मला इथें बांधून ठेवून तुम्हांला काय मिळणार? मला सोन्याच्या देठाचं निळं कमळ पाहिजे आहे. तें जर मला कोणी आणून देईल, तर त्याला मी समुद्रांतली अलोट संपत्ति देईन."

पण सोन्याच्या देठाचें तें निळें कमळ कोणालाच माहीत नव्हतें. मग तें कमळ कोण आणणार? आणि कोठून आणणार? त्या लोकांना फक्त समुद्रांतलीं बहुमोल रत्नें पाहिजे होतीं. ते तिला म्हणाले,

" मत्स्यकन्ये, तूं नेहमीं आमच्यापाशींच राहा. आम्ही तुला उत्तम उत्तम खायला प्यायला देऊं आणि तूं आम्हांला समुद्रांतलीं रत्नं आणून दे. देशील ? "

मीनेला वाटलें, आतां आपली सुटका करून घ्यायला ह्या लोकांना संपत्तीची लालूच दाखविणें हा एकच उपाय आहे. ती म्हणाली,

" मला तुम्ही समुद्रांत सोडलंत तर मी तुम्हांला ओंजळभर हिरे आणि माणकं देईन. सोडा मला. "

पण ते लोक इतके भोळे नव्हते. त्यांची खात्री होती कीं एकदा हिला समुद्रांत मोकळें सोडलें कीं मग ही कसची लागते आपल्या हाताला!

मग त्यांनीं मीनेला छळायला आणि त्रास द्यायला सुरुवात केली. तिला त्यांनीं चार दिवस उपाशी ठेवलें. भुकेनें मीनेचा जीव व्याकुळ झाला, तेव्हां त्यांनीं तिच्यापुढें सुग्रास अन्नाचें ताट आणून ठेवलें आणि ते तिला म्हणाले,

" आम्हांला ह्या ताटांत मावतील इतके मोती आणून देशील तर ह्या ताटांतील सगळे पदार्थ तुला खायला मिळतील. "

" मला सोडा तर समुद्रांत. " मीना म्हणाली.

नंतर त्यांनीं तिच्या सुंदर केसांना एक लांब दोर घट्ट बांधला आणि तिला समुद्रांत सोडलें. मीना जसजशी खालीं जाऊं लागली तसतसा दोर मोकळा सोडण्यांत येत होता. मीना खूप खालीं गेली आणि समुद्राच्या तळांतले बरेचसे मोती ओंजळींत घेऊन वर आली. ते मोती पाहून त्या लोकांना खूपच आनंद झाला. मीना काकुळतीनें त्यांना म्हणाली,

"मला एक घासभर तरी अन्न द्या. माझा जीव भुकेनें व्याकुळ झाला आहे. पांच दिवस मला तुम्हीं अन्नाचा एक कणही दिला नाहीं!"

पण मीनेची त्या लोकांना दया आली नाहीं. त्यांची हाव आतां अधिकच वाढली होती. अन्नाच्या आशेनें आपण मागूं त्या गोष्टी ही आपणांस समुदांतून आणून देत आहे असें पाहातांच त्यांतला एक प्रमुख लोभी मनुष्य म्हणाला,

"छे, छे, इतक्यांत नाहीं तुला खायला मिळणार. आम्हांला टोपलीभर मोती पाहिजेत. ते आणून देशील तर तुला पोटभर खायला मिळेल."

पुन्हा मीनेला समुद्रांत सोडण्यांत आलें. तिच्या हातांत एक भली थोरली टोपली देण्यांत आली होती.

अत्यंत कष्टानें मीना खालीं गेली. दुःखानें तिच्या शरीराला आणि मनाला असह्य वेदना होत होत्या. पण करणार काय बिचारी! तिनें आपली सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. पण तो दोर तिच्या केसांना इतका जोरानें बांधला होता आणि पाण्यामुळें तो इतका घट्ट बसला होता कीं दोर किंवा केस तुटल्याशिवाय तिची सुटका होणें अशक्यच होतें. तिनें एका हातानें दोर धरून पाहिला, पण तो इतका बळकट होता, कीं तो तोडणें अशक्यच होतें.

मीना तशीच आणखी खालीं गेली आणि एका खडकाच्या बळकट कपारीला आपल्या दोन्ही हातांच्या विळख्यानें तिनें घट्ट मिठी मारली.

मीना लवकर वर येत नाहीं असें पाहून ते लोक वरून जोरानें तो दोर ओढूं लागले, तशी मीनेच्या केसांना जोराची ओढ लागली आणि तिला असह्य वेदना होऊं लागल्या, पण ह्या वेदना तिनें सहन केल्या. त्या अधाशी दुष्ट मानवांच्या.... छे मानव कसले? लोभी नरराक्षसच ते!.... त्यांच्या तावडींत पुन्हा जाऊन अडकण्यापेक्षां ह्या वेदना परवडल्या असेंच तिच्या मनाला वाटत असावें.



“ .... इतक्यांत नाहीं तुला खायला मिळणार. आम्हांला टोपलीभर मोती पाहिजेत .... ”

वरून सारखी ओढ चालली होती. मीना वर न येतां दोर आंतच अडकला आहे असें आढळून येतांच कांठावर उभे असणाऱ्या सर्व लोकांनीं आपल्या शक्तीनें जोरजोरानें दोर ओढण्यास सुरुवात केली.

"हं ऽ, खेचा, ओढा .... आली .... आली, पाहा .... ओढा .... ओढा...."

आणि एकदम दोर ढिला झाला. भराभर त्या लोकांनीं दोर वर खेचला. दोराचें टोक पाण्याबाहेर आलें, तों .... काय ....!

मीनेचे ते सुंदर कुरळे काळे केस .... तुटून त्याचे पुष्कळसे पुंजके दोरीच्या टोकाबरोबर वर आले!



# नलिनी कीं निळें कमळ

मीना किती दिवस बेशुद्ध होती कोणास ठाऊक, पण ती जी शुद्धीवर आली ती एका मऊ आणि विस्तीर्ण वाळवंटावर पडली होती. तिनें डोळे उघडले आणि समोर पाहिलें तों गर्द नारळीच्या 'वृक्षांनीं आच्छादलेला भूप्रदेश तिच्या दृष्टीस पडला. भारत देश म्हणतात तो हाच तर नव्हे ना? अशा विचारांची आशेची एक मंद लाट तिच्या मनामध्यें उसळून गेली आणि त्या दुःखद स्थितींतही तिचा चेहेरा आशेनें प्रफुल्लित झाला.

'हाच जर भारत देश असेल तर आतां माझं निळं कमळ, तें सोन्याच्या देठाचं निळं कमळ मला खास मिळेल आणि मग धावत जाऊन मी त्या कमळाच्या स्पर्शानें माझ्या बांधवांची सुटका करीन !'

हाय ! आज दहा दिवसांच्या उपवासानें मीनेचा देह वाळून गेला होता. चेहेऱ्यावरचें तें पूर्वीचें तेज आतां कोठल्या कोठें मावळलें होतें आणि सुंदर केशकलाप पुष्कळसा तुटून गेल्यानें तिच्या पूर्वीच्या सौंदर्याची शोभा पार ओसरून गेली होती. पण मीनेचें आतां आपल्या देहावर आणि सौंदर्यावर प्रेम राहिलें होतें कोठें ? आपल्या बांधवांच्या उद्धारासाठींच केवळ ती इतक्या विलक्षण आणि भयदायक कष्टांतून गेली होती. तिच्या मनाचें सौंदर्य मात्र ह्या एकाच गोष्टीमुळें विकसित झालेलें होतें आणि म्हणूनच तेथून चाललेल्या दोन मुलींची दृष्टि मीनेकडे वळतांच तिच्यांत कांहींतरी विलक्षण ओढ असल्याचा त्यांना भास झाला. त्या मुलींपैकीं एक मुलगी म्हणाली,

" कुमुद, ती पाहा, कोण मुलगी ती ?"

" खरंच नल्लू, आपण जाऊन पाहूं या .... चल."

कुमुद आणि नल्लू एकदम धावतच मीनेकडे गेल्या.

त्यांनीं पाहिलें कीं एक आपल्यासारखीच, आपल्याएवढीच मुलगी जवळ जवळ बेशुद्ध अवस्थेंत वाळवंटांत पडली आहे. बिचारी पाण्यांत बुडली होती कीं काय ? कीं आणखी कांहीं झालं तिला एकाएकीं ?

" कोण आहेस ग तूं ? आणि इथें अशी कां पडली आहेस ? येतेस का आमच्या घरीं ?" नल्लू म्हणाली.

मीनेनें डोळे किंचित् वर करून पाहिलें, तों दहाबारा वर्षांची एक सतेज, गोरीपान, सुंदर पोर तिच्यापुढें उभी. तिच्या सर्व अंगाचा रंग अग्नींतून काढलेल्या शुद्ध सुवर्णासारखा असून डोळे निळेभोर होते.

मीनेनें तिला पाहिलें मात्र आणि तिला काय वाटलें कोणास ठाऊक, ती मनांत म्हणाली, 'सोन्याच्या देठाचं निळं कमळ, माझं निळं कमळ!'

"ताई, मला फार भूक लागली आहे ग, थोडं खायला देशील आणून? मला चालतां येत नाहीं, कारण मला जन्मापासून पाय नाहींत."

नळूला तिची फारच दया आली. मीनेचे पाय आणि अंग पातळानें झाकलें असल्यानें तिच्या कमरेखालचा भाग माशाचा आहे हें त्या दोन्ही मुलींच्या लक्षांत आलें नाहीं. त्यांना वाटलें, दुर्दैवी बिचारी, जन्मापासूनच पंगू असली पाहिजे.

"कुमुद, तूं थांब इथें. मी घरून कांहीं खायला घेऊन येतें." असें म्हणून नळू धावतच घरीं गेली.

नळूनें आणि कुमुदनें मीनेला खायला दिलें. थोड्याच वेळांत तिला थोडी हुशारी आली.

"तुझं नांव तरी काय? तुझी हकीकत आम्हांला सांग ना!" नळू म्हणाली.

"माझं नांव मीना. मला ना आई ना, बाप. जगाच्या दुःखानें मी वेडी झालें आहें. त्यामुळें फार दूरच्या देशाहून समुद्राच्या लाटांवरून मी इथें आलें आहें." मीना म्हणाली.

"पण बाई, अशी पायानें अधू तूं चालणार कशी? जगाचं दुःख तरी कसं दूर करणार?" कुमुद म्हणाली.

"माझे हजारों लाखों आप्त आहेत. हे माझे सगळे बांधव आज जखडून पडले आहेत आणि अनंत दुःखं भोगताहेत. त्यांच्या सुटकेसाठीं सोन्याच्या देठाचं निळं कमळ मला पाहिजे आहे."

"काय? निळं कमळ? मग माझं नांव आहे कीं निळं कमळ! नलिनी म्हणजे निळं कमळ! मी पडूं शकेन तुझ्या उपयोगी?"

नलिनी सहज म्हणाली. पण ह्या तिच्या शब्दांचा मीनेच्या मनावर एकदम परिणाम झाला. 'खरंच, नलिनी.... नळू.... म्हणजेच का निळं

कमळ ? अरे देवा ! मग माझं निळं कमळ मला सापडलं म्हणायचं शेवटीं ! ह्या मुलीचे हे निळे निळे डोळे ! तो सोन्यासारखा गोरा रंग ! आणि पाकळ्यांसारखे सुकुमार ओठ ! आणि सोन्याच्या देठाप्रमाणें ते पाय ! खास, खास, हेंच तें निळं कमळ ! सोन्याच्या देठाचं निळं कमळ तें हेंच !'

टक लावून आश्चर्यानें नलिनीकडे पाहात असतां मीनेच्या मनांत हे विचार घोळत होते. तिच्या मनाची हळूहळू खात्रीच होत होती आणि इतक्या दिवसांच्या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें तिला वाटत होतें. तिनें दिवस मोजून पाहिले. आतां अवघा एकच महिना कसा तरी उरला होता. ' तेवढ्या वेळांत हें माझं निळं कमळ मला त्या शुभ्र खडकापाशीं, त्या सागरजनांच्या देहाच्या बनलेल्या शुभ्र पर्वतापाशीं, नेलं पाहिजे. '

नलूला मीनेच्या मनांत चाललेल्या ह्या विचारांचा मागमूसही नव्हता. पण तिला मीना फारच आवडली. ती दररोज सकाळ संध्याकाळ घरून खायला आणून मीनेला देत असे व दिवसाचा पुष्कळसा वेळ मीनेशीं खेळण्यांत आणि समुद्रकांठच्या राईमधून मीनेबरोबर फिरण्यांत घालवीत असे.

नलूला एके दिवशीं हळूच पळवून नेण्याचा मीनेनें आपल्या मनाशीं बेत केला. मीनेच्या ह्या बेतामध्यें आपल्या सर्व लोकांची सुटका करण्याचाच उद्देश होता. ती बिचारी आजपर्यंत समुद्राच्या तळाशींच राहिल्यामुळें मनुष्यप्राणी पाण्याच्या खालीं जगूं शकणार नाहीं ही गोष्ट तिला मुळींच ठाऊक नव्हती. तिची आपली प्रामाणिक समजूत होती कीं नलिनीला एकदा त्या शुभ्र पर्वतापाशीं आपण नेलें आणि तिनें त्या पर्वताच्या खडकाला स्पर्श केला कीं आपलें काम झालें. मग लगेच आपण तिला परत इकडे आणून सोडूं किंवा तिला आवडलें तर सागरलोकांतच तिला ठेवून घेऊं. ह्या प्रामाणिक समजुतीच्या आशेवरच नलूला एके दिवशीं पळवून नेण्याची संधि ती शोधूं लागली.

शिवाय मीनेला नलिनीचें तें अत्यंत गोंडस आणि सुंदर रूप फारच आवडलें. नलिनीसारखी सुरेख मैत्रीण जर मला मिळाली तर माझ्या प्रवाळाच्या राजवाड्यांत मी तिला राणीप्रमाणें ठेवीन, असें मीना पुन्हा पुन्हा मनांत म्हणत असे.

मीनेनें समुद्रांतून सुंदर, मौल्यवान् रत्नें आणि मोती आणून त्यांचे नळूला अलंकार करविले. मीना ह्या नांवाची आपल्या मुलीला एक नवीन मैत्रीण मिळाली असून तिला पाय नाहींत आणि ती समुद्राच्या कांठाकांठानें भटकत असते ही हकीकत जेव्हां नळूच्या आईवडिलांना समजली तेव्हा प्रथम त्यांना थोडी भीति वाटली. शिवाय नळू रोज घरीं आणीत असलेलीं बहुमोल रत्नें पाहिल्यावर तर, ही नवीन मैत्रीण कोणी जादुगारीण किंवा चेटकी तर नाहीं ना, अशी शंकाही त्यांच्या मनांत येऊन गेली. पण त्या मुलीची नळूवर फार माया असून तिच्यामुळें आपल्या घरीं ही अलोट संपत्ति येत आहे असें पाहिल्यानंतर त्यांच्या तोंडाला उलट पाणीच सुटलें व ह्या नव्या मैत्रिणीचा आपल्या मुलीनें अधिकांत अधिक उपयोग करून घ्यावा अशी वेळोवेळीं त्यांनीं इच्छाही प्रकट केली.

नळूची आणि मीनेची खूप गट्टी जमली. दोघींना एकमेकींशिवाय करमत नसे. नळूच्या गळ्यांत हात टाकून मीना पुष्कळ वेळ बसत असे. तिचें अनेक तऱ्हांनीं कौतुकही करीत असे.

"नळू, तूं येशील का ग आमच्या घरीं?" मीनेनें तिला एकदा विचारलें.

"कुठें आहे तुझं घर?"

"लांब लांब समुद्रांत. तिथें एक भव्य आणि सुंदर राजवाडा आहे आमचा आणि त्याचीं दारं सोन्याचीं असून प्रवाळाच्या भिंतींना हिरे बसविलेले आहेत. सूर्याच्या अंधुक किरणांतही ते हिरे इतके चमकतात

कीं त्यांच्या प्रकाशामुळें आमच्या राजवाड्यांत सर्व ठिकाणीं उजेड पडलेला असतो !"

हें वर्णन ऐकून नळूला मोठें नवल वाटलें व मीनेचा तो सुंदर राजवाडा पाहायला आपण कधींतरी जावें अशी तीव्र इच्छाही तिच्या मनांत निर्माण झाली आणि तिनें विचारलें,

"खरंच मीना, मी तुझ्या देशाला आलें तर तिथें करमेल का ग मला ?"

"वा, वा ! न करमायला काय झालं ? तिथें कित्ती कित्ती मौज असते ! नळू, तूं जर तिथें आलीस तर सागर-देशाचा राजकुमार तुला एकदम पसंत करील आणि मग तूं आमची राणी होशील ! येशील का मग ?"

"हो, मी खरंच येईन !"

"मग आत्तांच कां येत नाहींस ?"

"आत्तां ?"

"हो आत्तां, चल ना ? चल, चल."

आणि मीनेनें नळूच्या कमरेला एकदम मिठी मारून तिला ओढायला सुरुवात केली.

ह्या अनपेक्षित प्रकारानें नळू फारच घाबरली, ओरडूं लागली आणि सुटकेसाठीं धडपड करूं लागली. पण तिच्या कमरेभोवतालची मीनेची पकड इतकी बळकट होती कीं ती सोडविणें तिला अशक्य झालें.

नळूच्या भयानक किंकाळ्या ऐकून शेजारच्या राईंतले लोक धावून येऊं लागले. ते लोक येऊन पोचायच्या आंत मीनेला समुद्र गांठायला पाहिजे होता. एकदा समुद्राच्या पाण्याला तिचे हात लागले कीं मग मीनेला पकडण्याचें सामर्थ्य कोणाच्या अंगांत होतें ? पण वाळवंटांतून घसरत, धडपडत जाण्यापलीकडे तिला गत्यंतर नव्हतें. नळूला दोन्ही हातांनीं घट्ट पकडून ती तशीच जातां येईल तितक्या जोरानें घसरत समुद्राच्या दिशेनें निघाली होती.



नलूच्या भयानक किंकाळ्या ऐकून शेजारच्या राईंतले लोक धावून येऊं लागले.

तो एकंदर प्रकारच विलक्षण होता. नल्लूला पकडून कोणीतरी समुद्राकडे नेत आहे आणि ती भीतीनें किंकाळ्या फोडीत आहे, हें दृश्य पाहून लोकांनीं काठ्या घेऊनच नल्लूला सोडविण्यासाठीं धाव ठोकली. खडकावरून, चिखलांतून, वाळूंतून ते धावतच आले. थोडाच अवकाश, थोडीच संधि मिळाली असती तर नल्लूसह मीना पार समुद्राच्या पोटांत गडप झाली असती. पण मीनेचें दुर्दैव ....

अगदीं पाण्यापासून चार हात अंतरावरच त्यांनीं मीनेस गांठलें. एकानें मीनेच्या डोक्यावर काठीचा तडाखा दिला. मीनेची मिठी सुटली! नल्लूला लोकांनीं सोडविलें!

रक्तबंबाळ डोकें झालेल्या मीनेला लोकांनीं काठ्यांनीं यथेच्छ झोडपलें आणि एवढ्यावरच समाधान न मानतां, ही कोणीतरी मनुष्यभक्षक चेटकी आहे असें समजून त्यांनीं मीनेला दोरांनीं बांधून जवळच्या कोतवाल चौकीवर नेलें!

वा. क. ...... नों. दि ......
वि. ...... क्र. ......



# फटक्यांची शिक्षा

**को**तवाल चौकीवर एका अंधेऱ्या कोठडींत मीनेला दोरीनें बांधून कैद करून ठेवण्यांत आलें होतें. सर्व शहरांत त्या वेळीं ह्या वार्तेनें खळबळ उडवून दिली. गांवांत पसरलेली वार्ता अशी होती :

‘सुमारें दोन आठवड्यांपूर्वीं समुद्राच्या कांठानें भटकत भटकत एक माणसें खाणारी चेटकी आली आहे. तिनें आतांपर्यंत पंचवीस मुलें खाऊनही टाकलीं ! कालच गोखल्यांच्या नळूला ती पकडून नेत असतां

आपल्यांच्या कुमुदनें तिला पाहिलें. तिनें ओरडा केला, लोक धावून आले आणि त्या राक्षसीच्या तोंडांतून त्यांनीं नद्धची सुटका केली !'

"असल्या राक्षसीला ठार केलं पाहिजे !" लोक बोलूं लागले.

"भर चौकांत तिची कातडी सोलून तिला जिवंत जाळली पाहिजे !" कोणी म्हणाले.

"पंचवीस मुलांना तिनें खाऊन टाकलं ! काय भयंकर राक्षस-प्राणी आहे हा ! काय वाटलं असेल त्या मुलांच्या आईबापांना !"

झालें. गांवांतल्या ह्या अफवांनीं मीनेवरचा लोकांच्या रागाचा पारा चढत चालला. हा प्राणी कसला आहे तें पाहावें तरी, म्हणून लोकांच्या झुंडीच्या झुंडी कोतवाल कचेरीकडे जाऊं लागल्या. पण लोकांच्या रोषामुळें कांहीं भलतासलता प्रकार होऊं नये म्हणून मीनेला पाहायची लोकांना बंदी करण्यांत आली.

बिचारी मीना ! दु:ख आणि लज्जा ह्यांत चूर होऊन त्या अंधेऱ्या कोठडींत पडली होती. आतां मात्र निळ्या कमळाच्या प्राप्तीची तिची आशा पार नष्ट झाली. आतां ह्या संकटांतून आपण जिवंत सुटणें शक्य नाहीं अशी तिची खात्रीच झाली. आपण कोणत्या उद्देशानें नद्धला नेत होतों आणि हें झालें काय ?

सरकारी अधिकाऱ्यांनीं मीनेची चौकशी आरंभिली. ती आली कोठून ? कशाकरितां ? इत्यादि गोष्टींची खरी खरी हकीकत जेव्हां मीनेनें त्यांना सांगितली, त्या वेळीं तर त्यांची खात्रीच झाली कीं ही कोणी तरी वेड लागलेली मुलगी असली पाहिजे. पण हिनें आतांपर्यंत पंचवीस मुलांना खाऊन टाकल्याच्या वार्तेला त्यांना कोठेंच पुरावा मिळेना. त्या शहरांतील लोकांपैकीं एकही गृहस्थ आपला मुलगा किंवा मुलगी नाहींशी झाल्याचें सांगण्यासाठीं पुढें येईना. येऊन जाऊन नद्धचीच काय ती हकीकत. पण तिनेंसुद्धा सांगितलें,

"मीना फारच गरीब आणि चांगली मुलगी आहे. तिच्या देशाला जायचं मींच कबूल केलं होतं !"

शेवटीं मीनेची पूर्ण चौकशी होऊन माणसें खाण्याचा कोणताही अपराध सिद्ध न झाल्यानें तिला सोडून देण्याचा हुकूम झाला. पण तिची वागणूक संशयास्पद असल्यामुळें आणि तिनें तो गांव तावडतोब सोडून जावें व पुन्हा परत येऊं नये, म्हणून तिला वीस फटके मारण्याची शिक्षा देण्यांत आली !

मीनेच्या कोवळ्या सुकुमार पाठीवर त्याच दिवशीं शिपायांनीं वीस फटके मारले. त्या फटक्यांनीं तिची पाठ रक्तबंबाळ होऊन पाठीची कातडीच निघाली. तिनें करुण आक्रोश केला, पण कोणालाही तिची दया आली नाहीं.

रात्रीच्या वेळीं तशा त्या भयंकर जखमी अवस्थेंत मीनेला बाहेर लोटून देण्यांत आलें. मीना सरपटत तुरुंगाच्या फाटकाच्या बाहेर गेली. डोक्याच्या आणि पाठीच्या जखमांनीं तिला मरणप्राय वेदना होत होत्या. जगण्याची आणि सोन्याच्या देठाचें तें निळें कमळ सागरलोकापर्यंत नेण्याची तिची आशा आतां पार लयास गेली होती. 'सगळी निराशा आणि अपयश पदरांत घेऊन सागरलोकांत मी जाऊं तरी कोणत्या तोंडानें !' असा विचार वारंवार तिच्या मनांत येई व तिला दुःखाच्या असह्य वेदना होत.

'हाय, परमेश्वरा ! मला जरी मृत्यु आला .... आणि तो आतां लवकरच येणार ह्याबद्दल मला मुळींच शंका नाहीं .... तरी मला क्षमा कर ! माझ्या हातून होईल तेवढा प्रयत्न मीं केला. मीं कितीतरी दुःखं आणि हाल सोसले .... एकाच आशेवर .... माझा सागरलोक दुःखमुक्त होईल ! ह्या देहानें कितीतरी कष्ट सोसले .... एकाच आशेनें कीं माझे बांधव हजारों वर्षांच्या कष्टांतून मोकळे होतील ! मी माझ्या बंधुभगिनींच्या

मुक्ततेसाठीं, त्यांच्या सुखासाठीं माझ्या सुखाची .... सर्वस्वाची होळी केली ! पण .... अखेर अपयशच ! अखेर .... अखेर .... !'

मरण्यासाठीं आपणाला सागरांतच प्रवेश केला पाहिजे ह्याची मीनेला खात्री होती. ह्या पृथ्वीवर, जमिनीवरच्या प्रदेशांत आपण अधिक काल राहिलों तर आणखी भयानक संकटें आपल्यावर कोसळतील आणि आपला प्राणही सुखानें जाणार नाहीं. शिवाय इहलोक सोडून गेल्यानंतर कायम बंदींत पडायचेंच तर निदान आपली आई, बहीण आणि बांधव हे ज्या ठिकाणीं दुःखें भोगीत बंदिवान होऊन पडले आहेत त्यांच्यांत तरी आपण जाऊन पडावें असें मीनेला वाटूं लागलें.

ती सरपटत रस्त्यावरून निघाली. रात्र असल्यामुळें तिच्याकडे फारसें कोणाचें लक्ष गेलें नाहीं. ती कांहीं अंतर गेल्यानंतर एका सुंदरशा घरांत कांहीं समारंभ चालल्याचें तिला आढळून आलें. ती दारांत गेली आणि पाहाते तों तें नलूचेंच घर होतें !

थोड्या दिवसांतच तिची अत्यंत जिव्हाळ्याची झालेली आणि आज पुरी दूर गेलेली जी मैत्रीण नलू तिला एकदा डोळे भरून पाहावें असें मीनेला फार फार वाटूं लागलें. ती तशीच सरपटत फाटकांतून आंत गेली आणि दारांतून तिनें आसावलेल्या डोळ्यांनीं आंत पाहिलें.

नलूचा आज तेरावा वाढदिवस होता. आईबापांची ती एकुलती एक लाडकी मुलगी असल्यानें आणि नुकतींच ती एका प्राणसंकटांतून वांचली असल्यानें तिचा हा वाढदिवस फारच मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला होता. हिऱ्याचे, पाचूचे, मोत्याचे कितीतरी मौल्यवान् अलंकार आज तिनें अंगावर घातले होते. हे सर्व अलंकार तिला मीनेकडून मिळालेल्या रत्नांचेच केले होते. तिच्या पुष्कळ मैत्रिणी तिच्या घरीं जमल्या होत्या आणि खूप मजेनें त्यांच्या गप्पा, गोष्टी, विनोद चालू होता.



तिच्याकडे एकाएकीं एका नोकराची दृष्टि गेली...

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २५५३६
विभाग सो.वा.
२५५७
२५३/५

मीनेनें डोळे भरून नळूला पाहिलें आणि ती पुटपुटली, '.माझं निळं कमळ! सोन्याच्या देठावर उमललेलं माझं निळं कमळ!!'

तिच्याकडे एकाएकीं एका नोकराची दृष्टि गेली आणि तो ओरडला,

"धरा, धरा, ती पाहा परवांची चेटकी!"

पण मीना मोठ्या चलाखीनें तेथून निसटली आणि एका झुडुपाच्या आड लपून बसली. नोकरानें आणि नळूच्या मैत्रिणींनीं खूप शोधलें, पण रात्र असल्यामुळें ती सापडली नाहीं. तेव्हां नोकराला कांहीं तरी भास झाला असेल असें समजून नळू आणि नळूच्या सर्व मैत्रिणी झोपीं गेल्या. नोकरानें दिवे मालवून घराचें दार बंद करून टाकलें.



# आत्मार्पण

स्फटिकासारख्या पाण्यामधून सागरलोकांत प्रविष्ट झालेले सूर्याचे किरण चित्रविचित्र रंग धारण करून समुद्राच्या तळाशीं विखुरलेल्या रत्नांबरोबर खेळत होते. इकडून तिकडे उगाचच खोडकर बालकांप्रमाणें धावणारीं माशांचीं बाळें निळ्या रंगाच्या मोत्यांप्रमाणें चमकत होतीं. खडकांवरून, प्रवाळांतून, शिंपल्यांवरून झळकणारे सूर्याचे अस्थिर मंद किरण सागराच्या' पोटांत अनेक चांदण्या तर बुडी मारून बसल्या नाहींत ना, असा आभास निर्माण करीत होते.

आज सागरलोकाचा मुक्ति-दिन किंवा चिरकाल बंदिदिन होता. त्या महान् शापाला आज सूर्य मावळतांच बरोबर एक लक्ष पंचवीस हजार वर्षें पुरीं होणार होतीं. आजच्या दिवसाच्या महत्त्वाची सागरलोकांतील इतर जीवांना कल्पनाही नव्हती, पण मीनेला मात्र ह्याची पुरी कल्पना होती.

आठ दिवस सारखा समुद्रांतून प्रवास करीत, भूक, विश्रांति, शरीराच्या आणि मनाच्या वेदना ह्यांची बिलकुल पर्वा न करतां मीना आठ दिवसांच्या घोर प्रवासानंतर आज सागरलोकांतल्या त्या सुप्रसिद्ध शुभ्र पर्वताच्या खडकापाशीं येऊन पोचली. आज सकाळपासूनच त्या खडकामधून करुण स्वर उमटण्यास सुरुवात झाली होती. पण मागच्याप्रमाणें आज ह्या आवाजानें मीना भ्याली नाहीं. करुणा आणि दुःखें ह्यांचा तिनें इतका अनुभव घेतला होता कीं आतां भय वाटण्यासारखें होतें काय त्या आवाजांत ?

" आई, ताई .... बाळांनो .... थांबा, मीही आतां तुमच्यांत लवकरच येणार आहें. तुमच्या सुटकेसाठीं मीं खूप खटपट केली, शिकस्त केली, पण माझं आणि तुमचं दुर्दैव ! "

मीनेनें त्या खडकाच्या थोडें अधिक जवळ जाऊन पाहिलें. तें सुळक्याचें तीक्ष्ण टोक आतां पाण्याच्या पृष्ठभागाच्या अगदीं जवळ पोचलें होतें. थोड्याच वेळांत .... कांहीं तासांनींच तें पाण्याबाहेर डोकावेल आणि सागरलोकाची मुक्ततेची आशा संपून जाईल !

सागरलोकाच्या मुक्ततेसाठीं निळें कमळ किंवा स्वतःचें बलिदान हे दोनच उपाय .... केवळ हे दोनच उपाय सांगितलेले होते. निळ्या कमळाची आशा संपली, आतां .... आतां दुसरा उपाय !

' दुसरा उपाय ! ह्या उपायानें सागरजनांची मुक्तता होईल. सागरजनांना ह्यापुढें बंदींत पडण्याचा प्रसंग येणार नाहीं. पण मला .... मी मात्र ह्या ठिकाणीं कायमची जखडून पडणार ! मला मात्र कधींही न संपणारीं अनंत दुःखं भोगीत ह्या ठिकाणींच कायम बंदींत राहावं लागणार ! देवा,

मी माझ्या बांधवांसाठीं माझ्या देहाची पर्वा न करतां असंख्य दुःखं भोगलीं, आतां त्यांच्या मुक्ततेसाठीं मला माझा आत्मासुद्धा दिला पाहिजे!'

मीनेच्या मनांत हे विचार आले आणि घोर निराशेनें तिचें मन भरून गेलें. 'कशाला आपण आत्मार्पण करायचं? आपल्या आत्मार्पणानें सागरलोक मुक्त झाला तरी माझा मात्र शरीरानें आणि आत्म्यानेंही कायमचाच नाश होणार!'

पण मीनेच्या मनांत हे विचार क्षणभरच टिकले. दुसऱ्याच क्षणीं ह्या विचारांची तिला लाज वाटली. ती पुटपुटली,

'देवा, मला क्षमा कर! माझ्या स्वार्थी विचारांची मला क्षमा कर. मी माझ्या बांधवांसाठीं, त्यांच्या मुक्ततेसाठीं सर्वस्व देण्याची तयारी आजपर्यंत केली नव्हती. माझ्या आत्म्याचंही दान मला द्यावं लागलं तरी मला आतां पर्वा नाहीं. त्यांच्या मुक्ततेसाठीं अनंत काळपर्यंत माझा आत्मा इथें दुःख भोगीत पडून राहिला तरी मला आतां त्याची पर्वा नाहीं!'

मीनेच्या मनांत एक तेजस्वी विचार विजेप्रमाणें चमकून गेला. तिचें सगळें अंग थरारलें, पण तें भीतीनें नव्हे, निश्चयानें!

मीनेनें त्या खडकाचें सूक्ष्म अवलोकन केलें. भोवतालीं हिंडून तो शुभ्र खडक नीट न्याहाळून पाहिला आणि त्या तरवारीसारख्या तीक्ष्ण सुळक्याचें टोक पाण्याच्या जितक्या उंच पातळीवर होतें तितक्या उंचावर समान रेषेंत ती कांहीं अंतर पूर्वेकडे गेली. तेथून त्या भाल्यासारख्या टोकाकडे तिनें दृष्टि टाकली आणि ....

मीनेचा चेहरा आज अत्यंत शांत आणि सुंदर दिसत होता. तिच्या मुखावर आणि सर्वांगावर हें विलक्षण तेज कोठून आलें होतें? इतक्या प्रवासाचा, कष्टांचा आणि उपवासाचा थोडाही परिणाम ह्या क्षणीं तिच्या मुखावर दिसत नव्हता. खोल मानवता, गाढ प्रेम आणि दिव्य स्वार्थत्याग ह्या भावनांची तेजस्वी छाया तिच्या मुखावर पडली होती. तिनें त्या

खडकाच्या .... त्या तीक्ष्ण सुळक्याच्या रोखानें एक जोराची उडी घेतली आणि ....

मीनेच्या हृदयांत त्या सुळक्याचें टोक आरपार घुसलें. तसेंच तिनें अंग बाजूस ओढून काढलें. दु:ख, वेदना, कष्ट ह्यांपैकीं कोणत्याच गोष्टीचा तिला अनुभव आला नाहीं! ह्यामुळें मीनेला मोठें आश्चर्य वाटलें! हृदय दुभंगून निर्माण झालेल्या सांधींतून जोरानें रक्त वाहूं लागेल म्हणून तिनें पाहिलें, तों रक्ताचा तर मागमूसही नाहीं! पण मीना पाहात असतां एक वस्तु टपकन् तिच्या हृदयांतून बाहेर पडली आणि काय होतें तें? मीना आश्चर्यानें पाहूं लागली ....

सोन्याच्या अत्यंत तेजस्वी देठावर पूर्ण उमललेलें तें निळें कमळ होतें.

इतके दिवस तहानभूक विसरून आणि भयंकर शारीरिक दु:खें आणि अपमान सहन करून ज्या निळ्या कमळाच्या शोधासाठीं ती सारें जग भटकून आली, तें मीनेचें निळें कमळ होतें तें!

'अहाहा! माझं निळं कमळ! सोन्याच्या देठावर उमललेलं माझं हें निळं कमळ! देवा, इतक्या जवळ माझ्या हृदयांतच तें असून मी वेड्यासारखी सारं जग ह्याच्या शोधासाठीं हिंडलें! निळं कमळ! माझं निळं कमळ!!'

मीनेनें तें कमळ हातांत घेतलें आणि त्याचा त्या शुभ्र खडकाला स्पर्श केला मात्र, बघतां बघतां तो प्रचंड पर्वत पाण्यांत वितळून कोठल्या कोठें नाहींसा झाला आणि त्या शुभ्र पर्वताबरोबरच ते विव्हळण्याचे करुण, दारुण शब्दही हवेमध्यें वितळून गेले! पाण्याखालीं, जलपृष्ठावर आणि अंतराळांत एकच दिव्य, तेजस्वी आणि रमणीय शांति पसरली! सर्वत्र मधुर शांति! शांति!!

ह्या चमत्काराचा मीनेला अर्थच कळेना, पण पराकोटीच्या आनंदानें आणि सुखानें तिला जवळ जवळ मूर्च्छाच आली. त्या मूर्च्छित अवस्थेंत



ह्या मूर्च्छित अवस्थेंत एक तेजस्वी तरुण आपल्यापाशीं उभा आहे असा तिला भास झाला.

एक तेजस्वी तरुण आपल्यापाशीं उभा आहे असा तिला भास झाला. त्याच्या प्रेमळ आणि मायेनें भरलेल्या हाताचा स्पर्श तिच्या डोक्याला अगदीं हुबेहूब जाणवला आणि त्याचे पुढील शब्दही स्पष्टपणानें तिच्या कानांवर आले,

"मीना .... मीना .... बाळ शाबास ! धन्य आहे तुझी ! सर्व प्रेमांत तुझं प्रेम श्रेष्ठ आहे, सर्व त्यागांत तुझा त्याग आदर्श आहे ! इतरांचीं दु:खं नाहींशीं व्हावींत म्हणून तूं जे कष्ट सोसलेस, तीच मानवता आज निळ्या कमळाच्या रूपानें तुझ्या हृदयांत प्रफुल्लित झाली आहे ! तुझे कष्ट व्यर्थ गेले नाहींत, ते सफल झाले ! दुसऱ्यांसाठीं सोसलेलीं तुझीं दु:खं सोन्याच्या देठावर निळ्या कमळाच्या पाकळ्यांच्या रूपानें उमललीं ! हेंच खरं निळं कमळ ! ह्याचं सौंदर्य आणि ह्याचा सुगंध जगाच्या अंतापर्यंत कायम राहील ! !"

तो शुभ्र पर्वत ज्या जागीं होता त्याच जागीं सागरजनांनीं मीनाक्षीचें एक सुंदर देवालय बांधलें आहे.

आज कित्येक वर्षें झालीं. सोनेरी लाटांना मऊ हातांनीं गोंजारणारा सूर्यनारायण आभाळाच्या रंगीबेरंगी रस्त्यावरून हळूहळू पावलें टाकीत पश्चिमेकडे जात असतां तो ह्या ठिकाणीं क्षणभर थांबतो आणि आपल्या सहस्रकरांनीं मीनाक्षीच्या देवालयावर सुवर्णफुलें उधळून मगच विश्रांति घेण्यासाठीं सागरांत बुडी मारतो.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ४९२ ता. दि. ........
वि. ........ क्र. ........
बा। बा।

## कमळाच्या पाकळ्या

कमळाच्या पाकळ्या मोजून किंवा त्यांच्यांतील मधुबिंदूंचें मापन करून कमळाची योग्यता ठरविणाऱ्याला अरसिक म्हटलें जातें. वाङ्मयीन कलाकृतीच्या बाबतींतही पुष्कळ वेळां हाच नियम लागू करतात. तथापि आस्वाद घेणाऱ्या रसिकोला कोणतीही कलाकृति निरखून पाहायला प्रतिबंध नसावा, हेंही तितकेंच खरें आहे.

“ निळें कमळ ” ही लघुकथा नव्हे किंवा लघु कादंबरीही नव्हे. कादंबरींत आवश्यक असलेलीं जीवनाचीं अंगें-उपांगें विस्तारानें किंवा माहितीपूर्ण पद्धतीनें ह्यांत रंगविलेलीं दिसणार नाहींत अथवा लघुकथेच्या यशस्वी लेखनाला अवश्य असलेला एकच एक परिणामकारक प्रसंग ह्या कथेंत आढळून येणार नाहीं; पण जीवनांतील कोणतेंतरी एक रमणीय आणि उदात्त अंग शक्य तितक्या परिणामकारक प्रसंगांतून दाखविण्याचा लेखकानें प्रयत्न केला आहे. ह्या दृष्टीनें प्रस्तुत कथाप्रकाराचें तंत्र आणि त्याचा हेतु अगदीं भिन्न आहेत. शक्य तितक्या हळुवारपणानें बालवाचकांच्या मनावर उदात्त विचारांचा एकच एक ठसा उठविणें हा लेखकाचा हेतु आहे आणि ह्या हेतूच्या सिद्ध्यर्थ त्यानें संभाव्य असंभाव्य अशा मोजक्या प्रसंगाचा – पण हे प्रसंग एकजीव नि संभवनीय वाटतील अशा बेतानें – अवलंब केला आहे.

सर्व उत्कृष्ट वाङ्मयाच्या मुळाशीं असणारी ‘ मानवता ’ ही तर अशा कथेचा आत्मा आहे. हा आत्मा नसेल तर अशा कथा केवळ पऱ्यांच्या गोष्टी ( Fairy Tales ) ठरतील. पण मानवतेच्या भावनेचा यथार्थ आविष्कार झाला असेल तर अशा कथेंतील अद्भुतरम्यताही संभवनीय वाटेल, कथेंतील अद्भुतता ही खोटी आहे असा भासही होणार नाहीं.

ज्ञान शिकविणें, माहिती देणें, जीवनाचें यथार्थ व संपूर्ण दर्शन घडविणें किंवा मनाला धक्का देणारा एखादा प्रसंग दाखविणें ह्यांपैकीं कोणताही लेखकाचा उद्देश नाहीं. कादंबरीची तुलना विशाल वटवृक्षाशीं करतां येईल, लघुकथा एखाद्या फुलाच्या ताटव्याप्रमाणें शोभेल; प्रस्तुत कथाप्रकाराची तुलना करायचीच झाली तर ती दुरून मधुर पण अविस्मरणीय सुगंध देणाऱ्या जाईच्या वेलीशीं करतां येईल. जाईच्या वेलीची अंगयष्टि लहान पण तिची संपत्ति मोठी आणि निराळी! तिचें जीवनकार्य छोटें, पण तें मनाच्या दुरितांना पळवून लावणारें, क्षणभर ह्या जगाची उंची वाढविणारें असतें! बरोबर हेंच कार्य अशा कथांचें आहे.

१. सागर लोकांना कोणता शाप, कोणीं दिला होता आणि कां दिला होता ?

२. ह्या शापांतून मुक्त होण्याचे कोणते मार्ग होते ?

३. मीनेनें " निळें कमळ " शोधण्यासाठीं कोणते प्रयत्न केले ?

४. मीनेची धडपड कशासाठीं होती ? लक्षद्वीपांतील लोकांची धडपड कशासाठीं होती ? विरोध स्पष्ट करून सांगा.

५. सर्व कथा वाचल्यानंतर कूर्मराजांच्या ग्रंथांतील पुढील ओळी कशा खऱ्या ठरल्या तें सांगा :

> " सोन्याच्या देठाचें निळें कमळ ! तें तुमच्यापासून
> फार दूर असून अगदीं जवळ आहे ! त्याची प्राप्ति
> अत्यंत दुःखदायक असून फार सुखमय आहे ! "

६. ह्या कथेंत शेवटपर्यंत एक रूपक आहे. कोणतें तें स्पष्ट करा.

